**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.०९/०४/२०२६

**मा.आयुक्त महोदयांनी केली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मुख्य नाल्यांची व सखल भागांची पाहणी; पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचे अधिकाऱ्यांना दिले निर्देश**

येत्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील जलनिस्सारण व्यवस्था सक्षम राहावी, संभाव्य पूरस्थिती टाळता यावी व नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.) महोदयांनी दि.०९ एप्रिल २०२६ रोजी शहरातील विविध भागांचा दौरा करून नाल्यांची तसेच सखल भागांची पाहणी केली.

या पाहणी दौऱ्यात शहरातील प्रमुख नाले, गटारे, पाण्याचा निचरा होणारी ठिकाणे तसेच दरवर्षी पावसाळ्यात पाणी साचण्याची शक्यता असलेले सखल भाग यांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. नाल्यांमधील गाळ काढण्याची कामे निश्चित वेळेत व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावे, तसेच पावसाळ्यापूर्वी सर्व नाल्यांची स्वच्छता सुनिश्चित करावी, अशा स्पष्ट सूचना मा.आयुक्तांनी दिल्या. नाल्यांमधील गाळ काढण्याची कामे, अडथळे दूर करण्याची प्रक्रिया, तसेच सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेची प्रगती याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. सर्व नाले व गटारे पावसाळ्यापूर्वी पूर्णपणे स्वच्छ व मोकळे ठेवण्यावर भर देण्यात आला.

तसेच सखल भागांमध्ये पाणी साचू नये यासाठी अतिरिक्त पंपिंग यंत्रणा तयार ठेवण्याचे, आपत्कालीन परिस्थितीसाठी नियंत्रण कक्ष सक्रिय ठेवण्याचे तसेच आवश्यक मनुष्यबळ व साधनसामग्री उपलब्ध ठेवण्याचे निर्देश मा.आयुक्त महोदयांनी अधिकाऱ्यांना दिले.

या पाहणी दौऱ्याची सुरुवात महानगरपालिका मुख्यालया शेजारील नाल्यापासून करण्यात आली. या दौऱ्यात रेल्वे कल्वर्ट क्र.८३ विरार (प.), म्हाडा इमारत क्र.१४ कल्वर्ट विरार (प.), बोळींज-खारोडी रस्ता कल्वर्ट विरार (प.), विनय युनिक कल्वर्ट गोकुळ टाऊनशिप, रानपाडा गाव कल्वर्ट, आगाशी पुरापाडा स्मशानभूमी कल्वर्ट, युनिटेक कॉम्प्लेक्स विरार (प.) व जुने विवा कॉलेज येथील सखल भाग, नारंगी गाव रेती बंदर कल्वर्ट, मारंबळ पाडा मार्गे चिखलडोंगरी खाडी, द्वारका हॉटेल परिसर आचोळे, मधुबन कॉम्प्लेक्स गोखीवरे, राजावली पुलाजवळील नाला, गोगटे सॉल्ट परिसर, ओमनगर येथील सखल भाग इ. परिसरात पाहणी करण्यात आली.

या दौऱ्यावेळी अतिरिक्त आयुक्त (दक्षिण) श्री.संजय हेरवाडे, अतिरिक्त आयुक्त (उत्तर) श्री.दिपक सावंत, महानगरपालिकेचे सर्व उप-आयुक्त, प्र.शहर अभियंता, सर्व प्रभाग सहाय्यक आयुक्त, सर्व अभियंते, सर्व आरोग्य निरीक्षक व संबंधित विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

मा. आयुक्त महोदयांनी महानगरपालिकेच्या सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करून पावसाळ्यात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. तसेच नागरिकांनीही नाल्यांमध्ये कचरा टाकू नये, स्वच्छता राखावी व महानगरपालिकेच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन केले आहे.